# -:: प्रेस नोट ::-

दिनांक १२/०८/२०२६

**साकीनाका पोलीस ठाणेकडून घरफोडी करणारी सराईत टोळी २४ तासाच्या आत पकडून एकुण ४४,३०,०००/- रुपये किंमतीची २२ किलो वजनाची चांदी व मोबाईल फोन हस्तगत केलेबाबत.**

दिनांक २५/०७/२०२६ रोजी रात्री १२.०० ते दिनांक २६/०७/२०२६ रोजी सकाळी ०८.०० वाजताचे दरम्यान फिर्यादी नामे मोहम्मद हुसैन अब्दुल करीम खान, वय ३० वर्षे, व्यवसाय-भंगार शॉप, रा. ठि. प्लॅट नं. ९०४, स्पेंन्टा प्लाझीयो बिल्डींग, सफेद पुल, जरीमरी, अंधेरी कुर्ला रोड, मुंबई. यांच्या एस. पी इंटरप्रायजेस नावाचे भंगाराचे दुकान शॉप नं. ४६, अनिस कंपाउंड, बी. एम. सी स्कुलच्या समोर, असल्फा अंधेरी घाटकोपर रोड, साकीनाका, मुंबई येथील ऑफीसचे कोणीतरी अज्ञात इसमांनी लॉक तोडुन आतमध्ये प्रवेश करून ऑफीसमधील टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेली २,००,०००/-रूपये रोख रक्कम, कपाटात ठेवलेली २२ किलो चांदी एकुण किंमत ४४,००,०००/-रूपये व शॉपमध्ये झोपलेल्या कामगाराचे दोन मोबाईल फोन एकुण किंमत ४०,०००/-रूपये असा एकुण ४६,४०,०००/-रूपये किंमतीची मालमत्ता फिर्यादी यांच्या संमतीशिवाय चोरी करुन नेली. म्हणुन फिर्यादी यांनी अज्ञात इसमाविरूदध कायदेशीर तक्रार दिल्याने साकीनाका पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक ७८९/२०२६ कलम ३०५(अ),३३१(४), ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

वर नमुद दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने साकीनाका पोलीस ठाणे, मुंबई गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उप निरीक्षक सचिन उगले, पोलीस उप निरीक्षक राजेंद्र माळी व गुन्हे प्रकटिकरण पथक यांनी तांत्रिक तपास व गुप्त बातमीदार यांच्या मार्फतीने प्राप्त माहितीच्या आधारे खालील नमुद आरोपी क्रमांक १ व २ यांना कौसा - मुंब्रा, जिल्हा - ठाणे याठिकाणाहून ताब्यात घेतले, आरोपी क्रमांक ३ यास भांडूप, मुंबई याठिकाणाहून ताब्यात घेतले तसेच आरोपी क्रमांक ४ यास गोवंडी, मुंबई या ठिकाणाहून ताब्यात घेवुन रितसर अटक केली आहे.

<u>अटक आरोपीतांचा नाव व पत्ताः-</u>

१) रमजान मकसुद साह, वय २० वर्षे, धंदा - नोकरी, रा.ठि - **सध्याचा पत्ता** - गाळा नंबर ४६, अजमेरी कंम्पाउंड, साकीनाका, मुंबई. **मुळ पत्ता** - ५४१/बी, पी.एन १२२, रोशन नगर, न्यु हैदंरगंज, लखनौ, राज्य - उत्तरप्रदेश
२) जिशान अब्दुल साबुध खान, वय २९ वर्षे, धंदा - ड्रायव्हर, रा.ठि - **सध्याचा पत्ता** - साबिया चाळ, ठाकुर पाडा, दहिसर मोरी, शीळ डायगर, मुंब्रा, जिल्हा-ठाणे.**मुळ पत्ता** - - - ५४१/बी, पी.एन १२२, रोशन नगर, न्यु हैदंरगंज, लखनौ, राज्य - उत्तरप्रदेश
३) अख्तर हुसेन गुलाम मुरतुजा खान, वय २७ वर्षे, रा.ठि - रूम नं ३०१/ आस्मा अपार्टमेट, तिसरा माळा, मुंब्रा, जिल्हा - ठाणे. **मुळ पत्ता** - अटकोनीया, तहसिल- सौरतगड, जि. सिध्दार्थनगर, राज्य - उत्तरप्रदेश
४) इरफान नुरउल्ला खान, वय २६ वर्षे, रा.ठि - रुम नंबर ३०२, सलमान अपार्टमेंट, सायन हॉस्पीटल जवळ, कौसा - मुंब्रा, जिल्हा - ठाणे. **मुळ पत्ता** - गांव - बेसनपुर, तालुका - इटावा, पोलीस ठाणे - नवगड बस्ती, जिल्हा - सिध्दार्थ नगर, राज्य - उत्तरप्रदेश

तरी साकीनाका पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोलीस उप निरीक्षक सचिन उगले, पोलीस उप निरीक्षक राजेंद्र माळी व पथक यांनी वर नमुद एकुण ०४ आरोपीतांना अटक करून घरफोडी करणारी सराईत टोळी पकडून एकुण किंमत ४४,३०,००/- रुपये किंमतीचे २२ किलो चांदी व एक मोबाईल फोन हस्तगत करून उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बुहन्मुंबई श्री. देवेन भारती सो, मा. पोलीस सह आयुक्त (का.व सु.), बुहन्मुंबई मनोजकुमार शर्मा, मा. अप्पर पोलीस आयुक्त सो, पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री. अभिनव देशमुख सो, मा. पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ ३, मुंबई,श्री. दत्ता नलावडे सो, सहाय्यक पोलीस आयुक्त (साकीनाका विभाग), श्री. दादासाहेब घुटूकडे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश मांदळे, साकीनाका पोलीस ठाणे, पो.नि.(गुन्हे) नितीन पाटील याच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोलीस उप निरीक्षक सचिन उगले, पोलीस उप निरीक्षक राजेंद्र माळी, पो.ह.क्र. ९६०१२०/दिपक कदम, पो.ह.क ०७.०५५७/रिक्की सौंदरमल, पो.ह.क ०७०९६४/पवार, पो.ह.क् ०७०३३६/भिंगावडे, पो.शि.क्र ०९०८५३/अयाज शेख, पो.शि.क ०९२४९२/परेश शिगवण, पो.शि.क ११०१३९/विशाल थोरात, पो.शि.क्र. १११६४२/रेवनसिध्द ढगे, पो.शि.क १११११२९/साळुंके व पो.ह.क्र.०६.०६९०/ पिसाळ ( तांत्रीक मदत, परिमंडळ-१०) यांनी पार पाडली.